पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ प्रभाग कार्यालय, निगडी - ४४
क्र.अप्र/प्रशा/२/कावि/१८१/९
दिनांक - ११ /०८/२००९

प्रति,
मा. ................................

सदस्य अ प्रभाग समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
निगडी पुणे - ४११ ०४४

**विषयः पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची सभा शुक्रवार दिनांक १४/०८/ २००९ रोजी आयोजित केलेबाबत.**

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची मासीक सभा शुक्रवार दिनांक १४/०८/२००९ रोजी दुपारी १२.०० वाजता अ प्रभाग कार्यालयातील "राजमाता जिजाऊसभागृह" येथे आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे हि विनंती.

आपला विश्वासू,

सही/-xxx
प्रशासन अधिकारी
अ प्रभाग कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी, पुणे - ४४

सर्व - १) सर्व सबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
अ प्रभाग समिती
**कार्यपत्रिका क्रमांक ५**

दिनांक - १४/०८/२००९ दुपारी १२.०० वाजता

---------------------------------------------------------------------------------

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे ऑगस्ट २००९ ची मासीक सभा शुक्रवार दिनांक १४/०८/२००९ रोजी दुपारी १२.०० वाजता अ प्रभाग कार्यालयातील "राजमाता जिजाऊ सभागृह" येथे आयोजित करणेत आली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

अ) दिनांक १०/०७/२००९ व दिनांक १८/०७/२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ४) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्र.१ पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या नियोजन नियंत्रण कक्षेतून वगळून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेत समाविष्ठ झालेल्या क्षेत्राच्या विकास योजनेबाबत विचार करणे.
(दि. १४/०८/२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.२ अ प्रभागांतर्गत कार्यक्षेत्रातील कार्यक्रमासाठी (कालमर्यादित) तात्पुरत्या स्वरुपात ध्वनीक्षेपण व प्रकाश व्यवस्था करणेकामी येणाऱ्या र. रु. ९,९९,०००/- (अक्षरी र. रु. नऊ लाख नव्याण्णव हजार फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३ अ प्रभाग स्थापत्य अ मुख्यालय विभागातील सन २००९-२०१० या अंदाजपत्रकातील कमी तरतुद असलेल्या चालु कामांकरीता इतर कामांमधुन तरतुद वर्ग करणेकामी प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.४ अ प्रभाग विद्युत विभागातील सन २००९-१० चे अंदाजपत्रकातील एकुण तरतुद न बदलता कामानिहाय तरतुदीमध्ये वाढ-घट करणेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

वषय क्र.५ अ प्रभाग स्थापत्य विभागातील सन २००९-१० मधील शून्य व कमी तरतूद असलेल्या कामांना तरतूद करणेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

सही/-xxx
प्रशासन अधिकारी
अ प्रभाग कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी, पुणे - ४४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ प्रभाग कार्यालय, निगडी - ४४
क्र.अप्र/प्रशा/२/कावि/ १८१ /०९
दिनांक - ११ /०८/२००९

टिप : प्रस्तुत कार्यप्रत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) अ प्रभाग कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ प्रभाग समिती
**कार्यपत्रिका क्रमांक ५**
**-- सभावृत्तांत --**

दिनांक : १४/०८/२००९ वेळ: सकाळी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे ऑगस्ट २००९ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक १४/०८/२००९ रोजी दुपारी १२.०० वाजता महानगरपालिकेच्या **अ** प्रभाग कार्यालयातील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा. दत्तात्रय बाबुराव साने - अध्यक्ष
२. मा. रघुनंदन रामभाऊ घुले
३. मा. विजया अशोक जाधव
४. मा. महेश गंगाराम चांदगुडे
५. मा. प्रकाश धरमसिंग बाबर
६. मा. मारुती साहेबराव भापकर
७. मा. भिमा सखाराम बोबडे
८. मा. शशिकिरण गवळी
९. मा. सुमनताई मधुकर पवळे
१०. मा. आर.एस.कुमार
११. मा. उल्हास शेट्टी
१२. मा. ज्ञानेश्वर निवृत्ती भालेराव
१३. मा. गोपाळ नाना कुटे
१४. मा. राजू मिसाळ

याशिवाय मा. श्री आर.डी. गायकवाड, प्रभाग अधिकारी, मा. श्री बी.टी.बनकर, कार्यकारी अभियंता (स्थापत्य अ प्रभाग), मा.श्री.एम.डी. निकम, कार्यकारी अभियंता (स्थापत्य मुख्यालय), मा.श्री जी. आर. चिंचवडे, कार्यकारी अभियंता (विद्युत), मा.श्री.ए.जी. भोसले, प्रशासन अधिकारी, मा.श्री एस.टी. आव्हाळे, लेखाधिकारी, मा.श्री.बी.आर. शेळके, मा. श्री पी. बी. नाईकरे,. सहाय्यक आरोग्य अधिकारी, मा.श्री.नितीन देशमुख, उपअभियंता (विद्युत) मा.श्री. सुधाकर कुदळे, मा.श्री सुपेकर, मा.श्री.फुटाणे, मा.श्री. दिलीप कुदळे, मा.श्री दांगट, उपअभियंता (स्थापत्य), मा.श्रीरामगुडे, श्री. विशाल कांबळे उपअभियंता (पाणीपुरवठा), मा.श्री.परदेशी, उपअभियंता (जल निःसारण), मा.श्री.चौरे, उपअभियंता (नगररचना), मा.श्री. निबाळकर कनिष्ट अभियंता (स्थापत्य), तसेच मा.श्री.कुर्ले, कनिष्ट अभियंता इत्यादी अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा. अध्यक्ष यांनी उपस्थित सन्माननीय नगरसदस्य व अधिकारी यांचे आभार मानून व स्वागत करून सभा सुरू करणेस अनुमती दिली.

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली

सुचकः मा. उल्हास शेट्टी अनुमोदक : मा. ज्ञानेश्वर भालेराव

कै. संजय काशीनाथ मिस्त्री व इतर ज्या नागरिकांचा स्वाईन फ्ल्यूमुळे मृत्यू झाला त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य करण्यात आली.
(सर्व उपस्थितांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

अ) मा. उल्हास शेट्टी -- मा. प्रभाग समिती सभा दिनांक १२/६/०९, ठराव क्र. ५८ व ५९ मध्ये "मा. विधी समिती मार्फत" हा मजकुर वगळण्याची दुरुस्ती करण्यात यावी.

मा. प्रभाग समिती सभा दिनांक १२/६/०९, ठराव क्र. ५८ व ५९ मध्ये "मा. विधी समिती मार्फत" हा मजकुर वगळून सभावृत्तांत दुरुस्ती करणेत आल्याचे व त्या दुरुस्तीसह दिनांक १२/०६/०९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.३) सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.अध्यक्षांनी प्रकट केले.

ब) दिनांक १०/०७/२००९ व दिनांक १८/७/२००७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.४) सभावृत्तांत कायम करणेत आलेचे अध्यक्षांनी प्रकट केले.

खालील प्रमाणे ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.१ आकुर्डी वॉर्ड क्र.५१, दत्तवाडी येथे भगवान कुटे चाळ व निरुपम सोसायटी परिसरात स्थापत्य विषयक कामे करणेकामी येणाऱ्या र.रु.९,९७,०००/- चे खर्चास प्रशासकिय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२ तरतुद वर्गीकरण करणेबाबत

विषय क्र.३ मा. ज्ञानेश्वर भालेराव यांचा प्रस्ताव
वॉर्ड क्र. ५३, आकुर्डी गावठाण मध्ये नवीन ट्रान्सफॉर्मर बसविणेबाबत.

विषय क्र.४ मा. आर.एस.कुमार यांचा प्रस्ताव
सेक्टर क्र.२५ प्राधिकरण येथील कॉलनीचे नामकरणाबाबत.

विषय क्र.५ मा. भिमा बोबडे यांचा प्रस्ताव
वॉर्ड क्र. ४३ मध्ये धोबी घाट बांधणेबाबत.

विषय क्र.६ मा. भिमा बोबडे यांचा प्रस्ताव
वॉर्ड क्र. ४३ मध्ये कमान करणेबाबत.

विषय क्र.७ मा. माऊली जाधव यांचा प्रस्ताव
रस्ता करणेबाबत

विषय क्र.८ मा. सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव
नामकरणाबाबत

विषय क्र.९ मा. रघुनंदन घुले यांचा प्रस्ताव
वॉर्ड क्र. २ मध्ये सुरक्षा भिंत बांधणेबाबत.

विषय क्र.१० मा. आर.एस. कुमार यांचा प्रस्ताव
महात्मा बसवेश्वराचा अर्धपुतळा बसविणेबाबत.

विषय क्र.११ मा. उल्हास शेट्टी यांचा प्रस्ताव
मोडकळीस आलेल्या मुतारीबाबत.

विषय क्र.१२ म.न.पा. च्या अशुध्द जल उपसा केंद्र, रावेत पंपगृहामधील पाणीप्रवाहमापक यंत्राची वार्षिक पध्दतीने देखभाल/ दुरुस्ती करणेकामी येणाऱ्या र.रु. ४,७६,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१३ म.न.पा. च्या अशुध्द जल उपसा केंद्र, रावेत येथे सी.सी.टी.व्ही. यंत्रणा बसविणेकामी येणाऱ्या र.रु. ४,९४,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ९९ | विषय क्रमांक | : १ |
| दिनांक | : १४/०८/२००९ | विभाग | : नगररचना व विकास विभाग |
| सुचक | : मा. रघुनंदन घुले | अनुमोदक | : मा. विजया जाधव |

संदर्भ : मा. आयुक्त सो यांचेकडील पत्र क्रमांक
जा.क्र. नरवि/कावि/३ /९२/०८ दिनांक २३/७/२००८

मा. आयुक्त सो यांनी शिफारस केलेप्रमाणे

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या नियोजन नियंत्रण कक्षेतून वगळून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेत समाविष्ठ झालेल्या क्षेत्राच्या विकास योजनेबाबत विचार करणे.

विषय क्र. १ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १०० | विषय क्रमांक | : २ |
| दिनांक | : १४/०८/२००९ | विभाग | : विद्युत |
| सुचक | : मा. महेश चांदगुडे | अनुमोदक | : मा. प्रकाश बाबर |

संदर्भ : मा. प्रभाग अधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक
जा.क्र. अप्र/वि/जा/ १९२/२००९ दिनांक २४ / ०७ /२००९

मा. प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे

अ प्रभागांतर्गत कार्यक्षेत्रातील विविध कार्यक्रमासाठी (कालमर्यादित) तात्पुरत्या स्वरुपात ध्वनीक्षेपण व प्रकाश व्यवस्था करणेकामी येणाऱ्या र. रु. ९,९९,०००/- (अक्षरी र. रु. नऊ लाख नव्याण्णव हजार फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १०१ | विषय क्रमांक | : ३ |
| दिनांक | : १४/०८/२००९ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. मारुती भापकर | अनुमोदक | : मा. भिमा बोबडे |

संदर्भ : मा. प्रभाग अधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक
जा.क्र.स्था/अ-प्र/ ७९०/२००९ दिनांक ७ / ०८ /२००९

मा. प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे

अ प्रभाग स्थापत्य मुख्यालय विभागातील सन २००९-२०१० या अंदाजपत्रकातील कमी तरतुद असलेल्या चालु कामांकरीता इतर कामांमधुन र.रु.२८,३०,०००/- इतकी वाढ-घट प्रस्तावा सोबतचे प्रमाणे तरतुद वर्ग करणेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १०२ | विषय क्रमांक | : ४ |
| दिनांक | : १४/०८/२००९ | विभाग | : विद्युत |
| सुचक | : मा. शशिकिरण गवळी | अनुमोदक | : मा. सुमनताई पवळे |

संदर्भ : मा. प्रभाग अधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक
जा.क्र. अप्र/वि/ २४५/२००९ दिनांक ७ / ८ /२००९

मा. प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे

अ प्रभाग विद्युत विभागातील सन २००९-१० चे अंदाजपत्रकातील एकुण तरतुद न बदलता कामनिहाय तरतुदीमध्ये र.रु.३९,६५,०००/- इतकी प्रस्तावा सोबतचे प्रमाणे कामनिहाय वाढ-घट करणेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १०३ | विषय क्रमांक | : ५ |
| दिनांक | : १४/०८/२००९ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. ज्ञानेश्वर भालेराव | अनुमोदक | : मा. उल्हास शेट्टी |

संदर्भ : मा. प्रभाग अधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक
जा.क्र. स्था/अप्र/८३४/२००९ दिनांक १० / ०९ /२००९

मा. प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे

अ प्रभाग स्थापत्य विभागातील सन २००९-१० मधील मूळ अंदाज पत्रकातील शून्य व कमी तरतूद असलेल्या कामांना प्रस्तावा सोबतचे प्रमाणे एकुण १० कामांना ११ कामांमधून र.रु.२०,४४,०००/- इतकी तरतूद करणेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १०४ | विषय क्रमांक | : ६ |
| दिनांक | : १४/०८/२००९ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. आर.एस.कुमार | अनुमोदक | : मा. गोपाळ कुटे |

संदर्भ : मा. प्रभाग अधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक
जा.क्र. अप्र/स्था/८४४/०९ दिनांक १२ / ०८ /२००९

मा. प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे

आकुर्डी वॉर्ड क्र.५१, दत्तवाडी येथे भगवान कुटे चाळ व निरुपम सोसायटी परिसरात स्थापत्य विषयक कामे करणेकामी येणाऱ्या र.रु.९,९७,०००/- (अक्षरी र. रु. नऊ लाख सत्याण्णव हजार फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १०५ | विषय क्रमांक | : ७ |
| दिनांक | : १४/०८/२००९ | विभाग | : पाणीपुरवठा |
| सुचक | : मा. राजू मिसाळ | अनुमोदक | : मा. रघुनंदन घुले |

संदर्भ : मा. प्रभाग अधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक
जा.क्र. अप्र/पापु/१/ कावि/ ७३१ /२००९ दिनांक ११ / ०८ /२००९

मा. प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे

अ प्रभाग पाणीपुरवठा विभागाकडील "बोनस तथा सानुगृह अनुदान" या लेखाशिर्षकामधील र.रु. ३०,००,०००/- पैकी र.रु. १,००,०००/- ही "वाहन इंधन" या लेखाशिर्षकावर वर्ग करणेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १०६ | विषय क्रमांक | : ८ |
| दिनांक | : १४/०८/२००९ | विभाग | : पाणीपुरवठा |
| सुचक | : मा. ज्ञानेश्वर भालेराव | अनुमोदक | : मा. उल्हास शेट्टी |

संदर्भ : मा. ज्ञानेश्वर भालेराव यांचा प्रस्ताव

वॉर्ड क्र. ५३, आकुर्डी गावठाण मध्ये पंचतारानगर व संभाजीनगर येथील लाईट सतत जाते. सांस्कृतिक भवनामधील ट्रान्सफॉर्मरवर लोड येत असल्याने आणखी एक नवीन ट्रान्सफॉर्मर बसविणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक : १०७ विषय क्रमांक : ९
दिनांक : १४/०८/२००९ विभाग :
सुचक : मा. शशिकिरण गवळी अनुमोदक : मा. सुमनताई पवळे

संदर्भ : मा. आर. एस. कुमार यांचा प्रस्ताव

सेक्टर क्र.२५ प्राधिकरण येथील कॉलनीचे (प्लॉट नं. ३५८ ते ६२४) "लक्ष्मी कॉलनी" असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक : १०८ विषय क्रमांक : १०
दिनांक : १४/०८/२००९ विभाग :
सुचक : मा. भिमा बोबडे अनुमोदक : मा. महेश चांदगुडें

संदर्भ : मा. भिमा बोबडे यांचा प्रस्ताव

वॉर्ड क्र. ४३ येथील अजंठानगर मध्ये धोबी घाट बांधणेस व त्याकामी येणाऱ्या र.रु. ९,९९,०००/- (अक्षरी र. रु. नऊ लाख नव्याण्णव हजार फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक : १०९ विषय क्रमांक : ११
दिनांक : १४/०८/२००९ विभाग :
सुचक : मा. भिमा बोबडे अनुमोदक : मा. प्रकाश बाबर

संदर्भ : मा. भिमा बोबडे यांचा प्रस्ताव

वॉर्ड क्र. ४३ येथील अजंठानगर येथे अहिल्याबाई होळकर कमान करणेकामी येणाऱ्या र.रु. ९,९०,०००/- (अक्षरी र. रु. नऊ लाख नव्वद हजार फक्त) चे खर्चास तसेच ज्या नगरसदस्यांनी त्यांचे वार्डात कमानी तयार करण्याबाबत या पूर्वी प्रस्ताव सादर केले आहेत त्या वार्डात कमानी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक : ११० विषय क्रमांक : १२
दिनांक : १४/०८/२००९ विभाग :
सुचक : मा. महेश चांदगुडें अनुमोदक : मा. भिमा बोबडे

संदर्भ : मा. माऊली जाधव यांचा प्रस्ताव

गट नं. ६०५ (चिखली) येथील जाधववाडी पासून दक्षिणेस गट नं. ५९४ येथील रस्ता मुंबई प्रांतिक महानगपालिका अधिनियम १९४५ चे कलम २०५ खाली घोषित केला असुन सदर रस्त्याची रुंदी १२.०० मीटर आवश्यक असली तरी सद्यपरिस्थितीत रस्त्यावरील रहदारीचा विचार करता रस्त्याची रुंदी ९.०० मिटर इतकी पुरेशी असलेने सदर रस्ता ९.०० मिटर रुंदीचा करणेस व भविष्यात सदरच्या रस्त्यावरील रहदारीचा त्यावेळी विचार करुन १२.०० मीटर करणेस मान्यता देणेत येत आहे. सदरचा ठराव कायम होणेची वाट न पहाता मा.महापालिका सभेकडे मान्यता मिळणेकामी शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक : १११ विषय क्रमांक : १३
दिनांक : १४/०८/२००९ विभाग :
सुचक : मा. सुमनताई पवळे अनुमोदक : मा. भिमा बोबडे

संदर्भ : मा. सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव

वॉर्ड क्र. ४८ निगडी मधील यमुनानगर येथील उद्यानास "श्री साईनाथ उद्यान" तसेच नियोजित व्यायामशाळेस दिवंगत "महापौर मधुकर पवळे व्यायामशाळा" असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक : ११२ विषय क्रमांक : १४
दिनांक : १४/०८/२००९ विभाग :
सुचक : मा. रघुनंदन घुले अनुमोदक : मा. प्रकाश बाबर

संदर्भ : मा. रघुनंदन घुले यांचा प्रस्ताव

वॉर्ड क्र. २ मध्ये धोकादायक ठिकाणी भित बांधणेकामी येणाऱ्या र.रु.९,९०,०००/- (अक्षरी र. रु. नऊ लाख नव्वद हजार फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक : ११३ विषय क्रमांक : १५
दिनांक : १४/०८/२००९ विभाग :
सुचक : मा. आर.एस.कुमार अनुमोदक : मा. भिमा बोबडे

संदर्भ : मा.आर.एस.कुमार यांचा प्रस्ताव

सेक्टर क्र. २४ मधील भक्ती-शक्ती उद्यानाशेजारील मुख्य रस्त्यालगत असलेल्या जागेत महात्मा बसवेश्वर यांचा अर्धपुतळा बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक : ११४ विषय क्रमांक : १६
दिनांक : १४/०८/२००९ विभाग :
सुचक : मा. उल्हास शेट्टी अनुमोदक : मा. प्रकाश बाबर

संदर्भ : मा. उल्हास शेट्टी यांचा प्रस्ताव

वॉर्ड क्र.५१ विठ्ठलवाडी येथील घाडगे फ्लोअर मील जवळील मनपाची मुतारी मोडकळीस आलेली असल्याने ती पाडण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक : ११५ विषय क्रमांक : १७
दिनांक : १४/०८/२००९ विभाग : विद्युत सेक्टर २३, ज.शु.के.
सुचक : मा. ज्ञानेश्वर भालेराव अनुमोदक : मा. सुमनताई पवळे

संदर्भ : मा. प्रभाग अधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक
ज.शु.के./वि/ २६३ / २००९ दिनांक १२ / ८ /२००९

मा. प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे

म.न.पा. च्या अशुध्द जल उपसा कैंद्र, रावेत पंपगृहामधील पाणीप्रवाहमापक यंत्राची वार्षिक पध्दतीने देखभाल दुरुस्ती करणेकामी येणाऱ्या र.रु. ४,७६,०००/- (अखरी र.रु. चार लाख शहात्तर हजार फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक : ११६ विषय क्रमांक : १८
दिनांक : १४/०८/२००९ विभाग : विद्युत सेक्टर २३, ज.शु.के.
सुचक : मा. रघुनंदन घुले अनुमोदक : मा. आर.एस.कुमार

संदर्भ : मा. प्रभाग अधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक
ज.शु.के./वि/ २५९ / २००९ दिनांक १० / ८ /२००९

मा. प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे

म.न.पा. च्या अशुध्द जल उपसा कैंद्र, रावेत येथे सी.सी.टी.व्ही. यंत्रणा बसविणेकामी येणाऱ्या र.रु. ४,९४,०००/- (अखरी र.रु. चार लाख चौऱ्याण्णव हजार फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा. सभा अध्यक्ष यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-xxx
(दत्तात्रय बाबुराव साने)
अध्यक्ष
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ प्रभाग समिती
क्र. अप्र/प्रशा/२/कावि/ १९१ /०९
दिनांक :- २४ / ० ८ /२००९

सही/-xxx
प्रशासन अधिकारी
अ प्रभाग कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी ४४

प्रत :- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना